महाराष्ट्र टाइम्स, पुणे ■ शनिवार, ११ मार्च २०१७



कै.शांताबाई ढोले पाटील माध्यमिक विद्यालयात विविध कार्यक्रम सादर करण्यात आले.

# ढोले पाटील विद्यालयात कार्यक्रम

**पुणे :** कै. शांताबाई ढोले पाटील माध्यमिक विद्यालयात महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. पंख सामाजिक संस्था आणि क्विकहिल फाउंडेशन यांच्या विद्यमानाने खडतर परिस्थितीत देखील मुलांना शिक्षणाची कास धरायला आदर्श मातांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. न. म.जोशी, महापालिकेचे शिक्षणाधिकारी दीपक माळी, क्विकहिल फाउंडेशनचे अध्यक्ष अजय शिर्के आणि ढोले पाटील शाळेचे मुख्याध्यापक वाल्मीक हजारे उपस्थित होते. या वेळी शाळेतील इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांनी व्यसनाधीनतेवर पथनाट्य सादर केले. तर स्वातंत्र्यवीर सावरकर यांची नात महिला शाहीर विनिता जोशी यांनी रचलेला झाशीच्या राणीच्या शूरतेवर आधारित पोवाडा मुलांनी सादर केला. पंख संस्थेच्या संचालिका स्मिता आपटे यांनी महिला दिनानिमित्त आदर्श मातांना समर्पित कविता सादर केली.

जोशी म्हणाले, 'महिलांच्या सबलीकरणाचे कौतुक करणारा पोवाडा सादर करून महिलाही कुठे कमी नसल्याचे विद्यार्थीनी दाखवून दिले आहे. आई कधीही आपण केलेल्या सेवेची किंमत ठरवत नाही. आज ज्या आदर्श माता येथे बोलल्या त्यावरून तुम्ही एक ध्यानात घेतली पाहिजे, की तुमची आई तुमच्यासाठी काबाडकष्ट करून शिकवते त्याची जाणीव ठेवून त्यांना आनंद होईल असेच कृत्य तुम्ही करा.'

माळी म्हणाले, 'मी महापालिकेच्या शाळेत शिकलो. घरची परिस्थिती बेताची होती. आईने शिवणकाम करून आम्हाला मोठे केले आणि शिक्षणाची जबाबदारी पेलली. आपले आई-वडील आपल्यासाठी जे कष्ट घेतायेत त्याची आपण जाणीव ठेवायला हवी आणि दर्जेदार शिक्षण घ्यावे.' कार्यक्रमाच्या शेवटी पंखच्या पदाधिकाऱ्यांनी स्त्री शिक्षणावर आधारित पोवाडा सादर केला. तसेच विद्यार्थ्यांनी 'बेटी बचाव' हे नाटक सादर केले.